ePaper
'दिल्ली की ढाका? ढाका, ढाका' बांगलादेशात पुन्हा भारतविरोधी घोषणाबाजी
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™

नगरसेवक निधीच्या खर्चावर महापालिकेचा अंकुश

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 1 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते धर्मध्वजारोहण; सिंहस्थ कुंभपर्वाची मंगलमय नांदी

गोदातीरावर सिंहस्थाचा शंखनाद!

महाईन्यूज । नाशिक

घड्याळाचा काटा शनिवारी दुपारी १२ वाजून दोन मिनिटांवर जाताच नाशिक येथील रामकुंडावर राष्ट्रपती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. आणि टाळ्यांचा कडकडाट, जय श्रीरामच्या जयघोषात सिंहस्थ कुंभपर्वास प्रारंभ झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, १३ आखाड्यांचे महंत, राज्यपाल जिष्णू देव वर्मा आदींची प्रमुख उपस्थिती होती.

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. या कुंभपर्वास नाशिक आणि त्र्यंबकेश्वर या दोन्ही ठिकाणी शनिवारी दुपारी १२ वाजून दोन मिनिटांनी ध्वजारोहणाने सुरुवात झाली. नाशिक येथील रामकुंड परिसरात राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कुंभमेळ्याचे ध्वजारोहण महिलेच्या हस्ते होण्याची ही पहिलीच वेळ. ध्वजारोहणाआधी राष्ट्रपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत काही धार्मिक विधी पूर्ण करण्यात आले.धर्मध्वजाचे पूजन, गंगापूजन तसेच ध्वजस्तंभाचे पूजन करण्यात आले.

रामकुंड परिसरात मुख्य धर्मध्वजासह गंगा-गोदावरी मंदिरावर ध्वजारोहण करण्यात आले. रामकुंड येथे उभारण्यात येणारा मुख्य धर्मध्वज स्तंभ हा ५१ फूट उंच आणि पंचधातूंचा वापर करुन तयार करण्यात आलेला आहे. या स्तंभावर समुद्रमंथनातून बाहेर आलेल्या १४ रत्नांचे प्रतिक साकारण्यात आले आहे. अमृत कलश धरलेला गरुडही स्तंभावर कोरण्यात आला आहे. दुसरा धर्मध्वज स्तंभ श्री गंगा गोदावरी माता मंदिराजवळ उभारण्यात आला आहे. या स्तंभाची उंची ३१ फूट असून हा स्तंभही पंचधातूचा आहे. या स्तंभावरही समुद्रमंथनातून आलेल्या १४ रत्नांचे चिन्ह आहे. त्यात हलाहल विष (कालकूट), कामधेनु (सुरभि गाय), उच्चैःश्रवा घोडा, ऐरावत हत्ती, कौस्तुभ मणी, कल्पवृक्ष पारिजात, रंभा (अप्सरा), महालक्ष्मी, वारुणी (सुरा/मद्य), चंद्रदेव (चंद्र), धन्वंतरी वैद्य, धनुष्य (हरिधनु), पांचाजन्य शंख, अमृत (अमृतकुंभ) यांचा समावेश आहे.

मुख्य धर्मध्वज हा साडेपंधरा फूट लांब आणि साडेपाच फूट उंचीचा आहे. ध्वजाच्या एका बाजूला बृहस्पतीचे वाहन सिंह, काळाचे प्रतिक म्हणून चंद्र-सूर्य दाखविण्यात आले आहेत. जोपर्यंत चंद्र, सूर्य आहेत, तोपर्यंत कुंभमेळा हा होतच राहणार, असा त्याचा अर्थ सांगितला जातो. मुख्य धर्मध्वजावरील सिंह हा शूरत्वाचे प्रतीक आहे. धर्मध्वजाच्या दुसऱ्या बाजूला अमृतकलश दाखविण्यात आला आहे. तो गोदामातेचे अमरत्वाचे व मुक्तीचे प्रतीक आहे. तसेच श्री आणि ओम हे हिंदू धर्माचे शुभचिन्ह म्हणून दाखवले आहे. मुख्य धर्मध्वजाला बारा रेशीम गोंडे, अंतर्नाद आणि ब्रम्हनादाचे प्रतिक म्हणून १५ घंटा आणि तीन घुंगरू आहेत. ध्वजाच्या चारही बाजूंना सुवर्ण रंगाची जरीची लेस लावण्यात आली आहे.

ध्वजारोहण कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, १३ आखाड्यांचे महंत, संत, राज्यपाल जिष्णू देव वर्मा, कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन , महापौर हिमगौरी आडके अहिरे, पुरोहित संघाचे पदाधिकारी आदी उपस्थित होते. ध्वजारोहण सोहळ्याचे साक्षी होण्यासाठी हजारो नाशिककर गोदाकाठी उपस्थित होते. नाशिक नगरी भगवेमय झाली. मंदिरे. गोदाकाठ परिसरावर नेत्रदीपक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. रामकुंड येथील मुख्य धर्मध्वज स्तंभ हा ५१ फूट उंच आणि पंचधातूंचा वापर करून तयार केलेला आहे.

धर्मध्वजातील प्रतीकांचे आध्यात्मिक महत्त्व

श्री गंगा गोदावरी पुरोहित संघाचा धर्मध्वज नऊ फूट लांब आणि पाच फूट उंचीचा आहे. या धर्मध्वजाच्या एका बाजूत गोदामातेचे अमरत्वाचे व मुक्तीचे प्रतीक म्हणून अमृतकलश, श्री आणि ओम हे हिंदू धर्माचे शुभचिन्ह दाखविण्यात आले आहे. ध्वजाला नऊ घंटा, सहा रेशमी गोंडे आणि तीन घुंगरु आहेत. गोंडे हे सामाजिक एकतेचे, संघ शक्तीचे प्रतीक आहेत. या धर्मध्वजाच्या दुसऱ्या बाजूला गोदावरी नदीचे वाहन मगर, सूर्य-चंद्र आहेत.

खडकवासल्याचे पाणी कोणाच्या वाट्याला?

शहराची २१.३४ टीएमसीची मागणी; ग्रामीण भागातील सिंचनाच्या आवर्तनावर अनिश्चितता

महाईन्यूज । पुणे

खडकवासला प्रकल्पातील चारही धरणे यंदा तुडुंब भरूनही हवेली, दौंड, बारामती आणि इंदापूर तालुक्यांतील शेतकऱ्यांसमोर सिंचनाच्या पाण्याचे संकट उभे राहिले आहे. पुणे शहराच्या पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याचा निर्णय कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला. शहरासाठी १३ टीएमसी पाण्याचे नियोजन करण्यात आले असले, तरी रब्बी आणि उन्हाळी हंगामातील सिंचनाच्या आवर्तनाबाबत ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे सुमारे ६० हजार हेक्टर सिंचन क्षेत्रातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या बैठकीत पुणे शहराच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले. पानशेत, वरसगाव, टेमघर आणि खडकवासला या चार धरणांची एकूण साठवणक्षमता २९ टीएमसी आहे. यंदा चांगला पाऊस झाल्याने चारही धरणे भरली होती. अतिरिक्त पाण्याचा मुठा नदीतून विसर्गही करावा लागला. मात्र, आता शेतीसाठी पाणी सोडण्याबाबत निर्णय न झाल्याने ग्रामीण भागात नाराजी वाढत आहे.

यंदाच्या खरीप हंगामात कालव्याद्वारे सुमारे ६.३८ टीएमसी पाणी सोडण्यात आले. रब्बीचे आवर्तन २५ सप्टेंबरपासून सुरू झाले आहे. मात्र, पाणीकोट्यात १० टक्के कपात करण्याचे आदेश असल्याने कालवे नियोजित वेळेपूर्वी बंद होण्याची शक्यता आहे. या भागातील शेती प्रामुख्याने खडकवासला कालव्याच्या पाण्यावर अवलंबून असल्याने ऊस, चारा पिके आणि पशुधनाच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ शकतो.

दरम्यान, पुणे शहराची लोकसंख्या सुमारे ८३ लाखांवर पोहोचली असून, समाविष्ट ३४ गावांमुळे पाण्याची मागणी वाढली आहे. २०२६-२७ या जलवर्षासाठी शहराने २१.३४ टीएमसी पाण्याची मागणी केली आहे. गेल्या वर्षी १६ टीएमसी पाणी मिळाले होते. त्यामुळे शहर आणि ग्रामीण भागातील पाणीवाटपाचा संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

धरणे भरली, तरी शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर!

पुणे शहरासाठी १३ टीएमसी पाण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, रब्बी आणि उन्हाळी हंगामातील सिंचनाच्या आवर्तनाबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. त्यामुळे हवेली, दौंड, बारामती आणि इंदापूर तालुक्यांतील सुमारे ६० हजार हेक्टर सिंचन क्षेत्राला पाणीटंचाईचा धोका निर्माण झाला आहे. दुसरीकडे, पुणे शहराला पुरविल्या जाणाऱ्या पाण्यापैकी तब्बल ३२ ते ३५ टक्के म्हणजेच सुमारे ४.६५ टीएमसी पाणी गळती आणि चोरीमुळे वाया जात आहे. त्यामुळे आधी पाण्याची गळती रोखून उपलब्ध पाण्याचा काटेकोर वापर करणे आणि शहरासह ग्रामीण भागालाही न्याय्य पाणीवाटप करणे आवश्यक आहे.

धरणे भरली; शेतीला पाणी नाही!

यंदा खडकवासला प्रकल्पातील चारही धरणे तुडुंब भरली असली, तरी शेतीच्या पाण्याचे नियोजन अद्याप स्पष्ट झालेले नाही. पुणे शहरासाठी १३ टीएमसी पाण्याचे नियोजन करण्यात आले आहे; मात्र ६० हजार हेक्टर सिंचन क्षेत्रातील शेतकऱ्यांना रब्बी आणि उन्हाळी आवर्तनाची प्रतीक्षा आहे. शहरात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाणीगळती आणि चोरी होत असताना शेतीसाठी पाणी कमी पडणे ही विसंगती आहे. पाण्याचा अपव्यय रोखून शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे.

मुळशीचे पाणी पूर्वेकडे वळणार; ५०० कोटींचा बोगदा प्रस्तावित!

महाईन्यूज । पुणे

मुळशी धरणातील पाणी पूर्वेकडील दुष्काळग्रस्त भागाला उपलब्ध करून देण्यासाठी राज्य पातळीवर हालचाली सुरू झाल्या आहेत. यासाठी सुमारे ४०० ते ५०० कोटी रुपये खर्च करून बोगदा बांधण्याचा पर्याय विचाराधीन आहे. या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तत्त्वतः मान्यता दिल्याची माहिती दौंडचे आमदार राहुल कुल यांनी दिली. या बोगद्याद्वारे मुळशी धरणातील पाणी मुळा-मुठा आणि भीमा नदीच्या खोऱ्यात आणण्याचे नियोजन आहे. या माध्यमातून सुमारे पाच टीएमसी पाणी पूर्वेकडील भागाला उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

मुळशी धरणातील पाण्याचा वापर प्रामुख्याने वीजनिर्मितीसाठी केला जातो. वीजनिर्मितीनंतर हे पाणी पश्चिमेकडे वाहून जाते. त्यामुळे पूर्वेकडील पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त गावांना या पाण्याचा थेट लाभ मिळत नाही. अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत असून, सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांनाही अडचणींचा सामना करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर वीजनिर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचा विसर्ग कमी करून ते पूर्वेकडे वळविण्याचा पर्याय पुढे आला आहे.

मात्र, मुळशी धरणातील पाणी पूर्वेकडे वळविताना वीजनिर्मितीवर होणारा परिणाम, पाणी सोडण्याचे प्रमाण, नदीपात्रातील प्रवाह आणि संबंधित भागांतील पाणीवाटप यांचा विचार करावा लागणार आहे. या सर्व तांत्रिक आणि प्रशासकीय बाबींची निश्चिती झाल्यानंतरच प्रत्यक्ष अंमलबजावणी शक्य होईल.

बोगद्याच्या खर्चाचा पेच कायम

मुळशी धरणातून पूर्वेकडे पाणी आणण्यासाठी बोगदा बांधण्याचा पर्याय विचाराधीन असून, त्यासाठी अंदाजे ४०० ते ५०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. मात्र, हा खर्च राज्य शासनाच्या निधीतून करायचा की हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) माध्यमातून उभारायचा, याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. राज्य शासनाकडूनच निधीची तरतूद होण्याची शक्यता व्यक्त केली जात असली, तरी प्रकल्पाची आर्थिक रचना निश्चित झालेली नाही. बोगद्याचा मार्ग, पाणी वाहून नेण्याची क्षमता आणि तांत्रिक व्यवहार्यता यांचाही सविस्तर अभ्यास करावा लागणार आहे.

> “मुळशी धरणातील पाणी बोगद्यामार्गे पूर्व भागाला देण्याचा प्रस्तावित आहे. त्याला राज्य पातळीवर सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. बोगद्याला मंजुरी आणि त्याचे काम पूर्ण होईपर्यंत नदीपात्रातून पाणी सोडण्यात यावे, असे पत्र राज्य शासनाला देण्यात आले आहे.”
>
> **- राहुल कुल, आमदार, भाजप, दौंड विधानसभा मतदारसंघ**

नगरसेवक निधीच्या खर्चावर महापालिकेचा अंकुश

रस्ते, पाणी, स्वच्छतेच्या कामांना प्राधान्य; आता केवळ ठरावीक कामांनाच परवानगी!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील प्रभागस्तरावरील विकासकामांसाठी नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीचा वापर आता निश्चित नियम आणि कार्यपद्धतीनुसारच करता येणार आहे. निधीचा विनियोग स्थानिक नागरिकांच्या गरजा, कामांची आवश्यकता आणि सार्वजनिक हित लक्षात घेऊन करण्याचे निर्देश महापालिका प्रशासनाने दिले आहेत. यासंदर्भात महापालिकेच्या लेखा व वित्त विभागाने परिपत्रक जारी केले असून, निधीतून कोणती कामे करता येतील आणि कोणत्या कामांवर निर्बंध असतील, हे स्पष्ट करण्यात आले आहे.

नगरसेवकांना आपल्या प्रभागात एक मोठे विकासकाम, विविध ठिकाणी लहान कामे किंवा बहुसदस्यीय प्रभागातील नगरसेवकांना संयुक्तपणे मोठे काम सुचविता येणार आहे. मात्र, त्यासाठी प्रत्येक नगरसेवकाच्या अर्थसंकल्पीय निधीची मर्यादा पाळावी लागणार आहे. संयुक्त कामांसाठी निधी एकत्रित करण्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता आवश्यक राहील. नगरसेवकांनी सुचविलेल्या कामांना प्रशासकीय आणि वित्तीय मान्यता घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. २५ लाख रुपयांपर्यंतच्या प्रस्तावांना नियमानुसार अतिरिक्त आयुक्तांकडून मान्यता दिली जाणार असून, त्यापेक्षा अधिक खर्चाच्या कामांसाठी स्थायी समितीची पूर्वमान्यता आवश्यक राहणार आहे.

नगरसेवक स्वेच्छा निधीतून रस्त्यांची दुरुस्ती, लहान पूल, पाणीपुरवठा सुविधा, गटारे, सार्वजनिक स्वच्छता, पदपथ, सार्वजनिक शौचालये, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, समाजमंदिरे, सार्वजनिक वाचनालये, प्राथमिक शाळांमधील आवश्यक दुरुस्ती, उद्यानांचा विकास, महापालिकेच्या जागांवरील खेळणी आणि व्यायाम साहित्य तसेच स्मशानभूमीतील मूलभूत सुविधांची कामे करता येणार आहेत. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित आणि सार्वजनिक उपयोगाच्या कामांना प्राधान्य देण्यात आले आहे.

खासगी कामांना सार्वजनिक निधी नाही!

नगरसेवक स्वेच्छा निधीचा वापर सार्वजनिक हिताच्या कामांसाठीच करता येणार आहे. खासगी इमारतींची दुरुस्ती, अनधिकृत वस्त्यांमधील कामे, अनुदानित संस्थांची काही कामे आणि निधीच्या उद्देशाशी विसंगत बांधकामांना परवानगी राहणार नाही. त्यामुळे निधीच्या वापरावर प्रशासकीय नियंत्रण राहणार आहे.

दुसरीकडे, खासगी इमारतींची दुरुस्ती, अनधिकृत वस्त्यांमधील कामे, अनुदानित संस्थांची काही कामे, मोठ्या स्वरूपाची स्वतंत्र बांधकामे आणि स्वेच्छा निधीच्या मूळ उद्देशाशी विसंगत असलेल्या कामांसाठी निधी खर्च करता येणार नाही. काही विशिष्ट कामांसाठी स्वतंत्र अटी आणि निर्बंधही लागू राहणार आहेत.

निधीतून कामे सुचविताना संबंधित नगरसेवकांची लेखी शिफारस, आवश्यक प्रशासकीय व वित्तीय मान्यता आणि विहित कार्यपद्धतीचे पालन करणे बंधनकारक असेल. निधीचा वापर करताना कामांचे महत्त्व, नागरिकांना होणारा लाभ आणि उपलब्ध निधी यांचा विचार करण्यात येणार आहे. शासननिर्णय व महापालिकेच्या परिपत्रकातील तरतुदींनुसार निधीचा विनियोग करून नागरी सुविधांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत.

नागरी सुविधांच्या कामांना प्राधान्य

या निधीतून रस्ते, लहान पूल, पाणीपुरवठा, सार्वजनिक स्वच्छता, गटारे, समाजमंदिरे, सार्वजनिक वाचनालये, प्राथमिक शाळांमधील आवश्यक दुरुस्ती, सार्वजनिक उपयोगाच्या सुविधा, उद्याने, महापालिकेच्या जागांवरील खेळणी व व्यायाम साहित्य, पादचारी सुविधा, तसेच इतर आवश्यक नागरी कामे करता येणार आहेत. याशिवाय सार्वजनिक शौचालये, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, स्मशानभूमीतील मूलभूत सुविधा आणि नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित कामांचाही समावेश आहे. मात्र, खासगी इमारतींची दुरुस्ती, अनधिकृत वस्त्यांमधील कामे, अनुदानित संस्थांची काही कामे, मोठ्या स्वरूपाची स्वतंत्र बांधकामे आणि स्वेच्छा निधीच्या उद्देशाशी सुसंगत नसलेली कामे या निधीतून करता येणार नाहीत. काही विशिष्ट कामांसाठी स्वतंत्र अटी व निर्बंधही नमूद करण्यात आले आहेत.

पुणे-लोणावळा रेल्वेच्या तिसऱ्या-चौथ्या मार्गिकेला मुहूर्त कधी?

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

औद्योगिकनगरी पिंपरी-चिंचवडमधून दररोज हजारो नागरिक नोकरी, व्यवसाय आणि शिक्षणासाठी पुणे, मुंबई, लोणावळा परिसरात प्रवास करतात. वाढत्या वाहतूक कोंडीमुळे लोकल रेल्वेला प्रवाशांची पसंती मिळत असतानाच पुणे-लोणावळा मार्गावरील तिसरी आणि चौथी रेल्वे मार्गिका अद्याप प्रत्यक्षात आलेली नाही. त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळणार कधी, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पुणे ते लोणावळा या ६३.८४ किलोमीटरच्या मार्गावर सध्या दोनच रेल्वे मार्गिका आहेत. लोकल, एक्स्प्रेस आणि मालगाड्यांची वाहतूक एकाच मार्गावर होत असल्याने लोकलच्या फेऱ्या वाढविण्यात अडचणी येत आहेत. मुंबई रेल्वे विकास महामंडळाने जून २०१६ मध्ये अतिरिक्त मार्गिकांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला होता. मात्र, प्रकल्पाचे नियोजन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामधील अंतर कायम आहे.

सुमारे ५,१०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पासाठी राज्य सरकारने ५० टक्के आर्थिक सहभागास सप्टेंबर २०२५ मध्ये मंजुरी दिली. तरीही रेल्वे मंत्रालयाची अंतिम मान्यता, निधीची उपलब्धता आणि जमीन संपादनासह प्रत्यक्ष कामाच्या वेळापत्रकाबाबत

स्पष्टता होणे आवश्यक आहे

दरम्यान, पिंपरी-चिंचवड शहराचा औद्योगिक विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता चिंचवड रेल्वे स्थानकावर अधिक लांब पल्ल्याच्या एक्स्प्रेस गाड्यांना थांबे देण्याची मागणीही पुढे येत आहे. कोयना, सिंहगड, पनवेल–नांदेड, लातूर, जोधपूर आणि तिरुपतीकडे जाणाऱ्या गाड्यांच्या थांब्यांबाबत व्यवहार्यता तपासण्याची गरज व्यक्त होत आहे.

तिसरी आणि चौथी मार्गिका कार्यान्वित झाल्यास लोकलच्या अतिरिक्त फेऱ्या, रेल्वे वाहतुकीचे सुधारित नियोजन आणि प्रवाशांना अधिक सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे रखडलेल्या प्रकल्पाला गती देऊन प्रत्यक्ष काम कधी सुरू होणार, याकडे लाखो प्रवाशांचे लक्ष लागले आहे.

चिंचवडला एक्स्प्रेस गाड्यांचे अतिरिक्त थांबे हवेत!

पिंपरी-चिंचवड शहरातील औद्योगिक विकास आणि वाढती प्रवासीसंख्या लक्षात घेता चिंचवड रेल्वे स्थानकावर लांब पल्ल्याच्या गाड्यांना अतिरिक्त थांबे देण्याची मागणी पुढे येत आहे. कोयना, सिंहगड, पनवेल–नांदेड, लातूर, जोधपूर आणि तिरुपती मार्गावरील गाड्यांच्या सध्याच्या थांब्यांची आणि अतिरिक्त थांब्यांच्या व्यवहार्यतेची तपासणी करण्याची गरज व्यक्त होत आहे.

भूमिका

दुष्काळ, नापिकी आणि आर्थिक संकटामुळे आधीच अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या गळ्याभोवती आता मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कर्जाचा फास आवळला जात आहे. अवैध सावकारी संपविण्याच्या घोषणा अनेकदा झाल्या; मात्र प्रत्यक्षात या सावकारीची पाळेमुळे अधिक खोलवर रुजली आहेत.

मायक्रो फायनान्सचा विळखा; शेतकऱ्यांच्या जिवाशी खेळ!

नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यात घडलेल्या चंद्रकांत शिंदे यांच्या मृत्यूच्या घटनेने या भयावह वास्तवावर पुन्हा प्रकाश टाकला आहे. माळकौठा येथील अल्पभूधारक शेतकरी चंद्रकांत शिंदे यांचा मायक्रो फायनान्स कंपनीच्या कार्यालयात मृतदेह आढळला. अपहरण करून डांबून ठेवल्याचा आणि मारहाणीत मृत्यू झाल्याचा आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे.

या प्रकरणी संबंधित कंपनीविरोधात अपहरण आणि खुनाचा गुन्हा दाखल झाल्याचे वृत्त आहे. अवघ्या दहा हजार रुपयांच्या कर्जापोटी तब्बल ७० हजार रुपयांची वसुली करण्याचा प्रकार समोर आल्याने कर्जवसुलीच्या पद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. २० ते ३० टक्के व्याज आणि विलंब झाल्यास दररोज दंड, अशा जाचक अटींमुळे गरीब कर्जदारांचे आर्थिक शोषण होत असल्याचे चित्र आहे. मायक्रो फायनान्स कंपन्यांचे जाळे आता ग्रामीण भागात खोलवर पोहोचले आहे. शेतकरी, शेतमजूर, महिला, फेरीवाले आणि रिक्षाचालक हे त्यांचे प्रमुख कर्जदार आहेत. राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणी, तारणाचा अभाव आणि खराब पतनोंदी यामुळे अनेकांना अशा कंपन्यांकडे वळावे लागते. गरजेच्या वेळी मिळणाऱ्या कर्जाचा आधार नंतर आर्थिक संकटाचे कारण ठरतो.

कर्जाच्या परतफेडीसाठी अवाजवी व्याज, दंड आणि कथित दबावाचे मार्ग वापरले जात असतील, तर ते केवळ आर्थिक शोषण नसून गंभीर सामाजिक समस्या आहे. या प्रकरणानंतर प्रशासनाने बैठका घेणे, सीसीटीव्ही बसविण्याच्या सूचना देणे आणि कारवाईचे इशारे देणे सुरू केले आहे. मात्र, एखाद्या शेतकऱ्याचा जीव गेल्यानंतरच यंत्रणेला जाग येणे ही चिंतेची बाब आहे. तक्रार आल्यानंतरच कारवाई करण्याची भूमिका पुरेशी नाही. भीतीपोटी अनेक कर्जदार तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. त्यामुळे पोलिस आणि संबंधित विभागांनी स्वतःहून चौकशी करून बेकायदा सावकारीचे व्यवहार शोधले पाहिजेत. रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वित्तीय संस्थांवर सक्षम यंत्रणेमार्फत कारवाई झाली पाहिजे. अवैध सावकारांचे आर्थिक व्यवहार तपासणे, बेकायदा व्याजवसुली रोखणे आणि धमकावणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर शेतकऱ्यांना वेळेत आणि सुलभ पीककर्ज उपलब्ध करून देण्याची जबाबदारी बँकांनी पार पाडली पाहिजे. शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी केवळ घोषणा नकोत, तर ठोस कृती हवी. चंद्रकांत शिंदे यांच्या मृत्यूची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे. अन्यथा मायक्रो फायनान्सच्या नावाखाली सुरू असलेले शोषण असेच सुरू राहील आणि आणखी कित्येक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होतील.

प्रासंगिक »

शांततेची ताकद

एका गावात दोन शेजारी राहत होते. त्यांच्यामध्ये शेताच्या बांधावरून नेहमी वाद होत असे. दोघेही आपापली बाजू खरी असल्याचे सांगत आणि गावकऱ्यांनाही त्यात ओढत. एके दिवशी गावात नवीन तलाव बांधण्याचे काम सुरू झाले.

दोघांच्या शेतातून तलावाकडे जाणारा एक रस्ता होता. वादामुळे त्यांनी कामगारांना रस्ता वापरू दिला नाही. परिणामी तलावाचे काम रखडले.

गावातील एका वृद्ध महिलेने दोघांना बोलावले. ती म्हणाली, "तुमच्या वादामुळे गावाचे नुकसान होत आहे. उद्या तुमच्या मुलांना हाच रस्ता वापरायचा असेल, तर त्यांना काय वारसा देणार?"

दोघांनाही आपली चूक जाणवली. त्यांनी गावाच्या बैठकीत रस्त्यासाठी जागा देण्याचा निर्णय घेतला. तलावाचे काम पुन्हा सुरू झाले आणि संपूर्ण गावाला पाण्याचा फायदा झाला.

त्या दिवसापासून दोघांनीही वादाऐवजी संवादातून प्रश्न सोडवण्याचा मार्ग स्वीकारला.

- तात्पर्य : अहंकार माणसांना दूर करतो; समजूतदारपणा समाजाला जोडतो.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग सर्वोच्च न्यायालयाने मोकळा केला असला, तरी ओबीसी आरक्षणाचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही.

निवडणुका होणार; ओबीसींच्या आरक्षणाचे काय?

राज्यातील २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास न्यायालयाने परवानगी दिली आहे. मात्र, या निवडणुकांचे निकाल ओबीसी आरक्षणासंदर्भातील याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या अधीन असतील, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे निवडणुकांचा मार्ग खुला झाला असला, तरी ओबीसींच्या राजकीय प्रतिनिधित्वाबाबत अनिश्चितता कायम आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणाचा प्रश्न गेल्या पाच वर्षांपासून न्यायालयीन प्रक्रियेत अडकला आहे. महाराष्ट्रात १९९४ पासून ओबीसींना २७ टक्के आरक्षण दिले जात होते. मात्र, या आरक्षणाला पुरेशा आकडेवारीचा आधार नसल्याचा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये त्याला स्थगिती दिली. ओबीसींचे राजकीय मागासलेपण सिद्ध करणारी आकडेवारी, स्वतंत्र आयोगाचा अहवाल आणि एकूण आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा या अटी न्यायालयाने स्पष्ट केल्या. त्यानंतर राज्य सरकारने सर्वेक्षण आणि आयोगाच्या माध्यमातून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत अनेक जिल्ह्यांमध्ये आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेल्याने पेच निर्माण झाला. अनुसूचित जाती-जमातींचे घटनात्मक आरक्षण आणि ओबीसी आरक्षण यांची एकत्रित टक्केवारी ५० टक्क्यांच्या पुढे जात असल्याने २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका रखडल्या. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे निवडणुकांना हिरवा कंदील मिळाला असला, तरी अंतिम निकाल न्यायालयीन निर्णयावर अवलंबून राहणार आहेत.

यातच मतदारयादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला मुदतवाढ मिळाल्याने निवडणुकांचे वेळापत्रकही पुढे जाण्याची शक्यता आहे. अंतिम मतदारयादी प्रसिद्ध झाल्यानंतर डिसेंबर-जानेवारीमध्ये निवडणुका होण्याचा अंदाज आहे. मात्र, निवडणुकांची तारीख निश्चित होणे आणि आरक्षणाचा प्रश्न निकाली निघणे या दोन स्वतंत्र बाबी आहेत. विशेष म्हणजे, प्रत्येक जिल्ह्यात ओबीसींना सरसकट २७ टक्के आरक्षण मिळणे शक्य नाही. आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये अनुसूचित जमातींचे आरक्षण अधिक असल्याने ओबीसींच्या वाट्याला कमी जागा येऊ शकतात. परिणामी, विविध ओबीसी समाजघटकांच्या राजकीय प्रतिनिधित्वावर मर्यादा येण्याची शक्यता आहे.

अशा परिस्थितीत राजकीय पक्षांनी उमेदवारी देताना ओबीसी समाजाला किती प्रतिनिधित्व दिले, यालाही महत्त्व राहणार आहे.ओबीसी आरक्षणाचा प्रश्न केवळ निवडणुकीपुरता मर्यादित नाही. जातनिहाय जनगणना, लोकसंख्येची अचूक आकडेवारी आणि आरक्षणाला भक्कम घटनात्मक आधार या बाबी महत्त्वाच्या आहेत. सरकारने न्यायालयीन प्रक्रियेसोबतच या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची भूमिका घेतली पाहिजे. अन्यथा निवडणुका होतील, सत्तेची समीकरणे बदलतील; पण ओबीसींच्या राजकीय हक्कांचा प्रश्न पुन्हा अधांतरीच राहील. निवडणुकांचा मार्ग मोकळा करणे पुरेसे नाही, तर ओबीसींच्या प्रतिनिधित्वाला कायदेशीर स्थैर्य देणे हीच खरी कसोटी आहे.

।। अभंगवाणी ।।

शब्दा नाहीं धीर ।
ज्याची बुद्धि नाहीं स्थिर ॥१॥

त्याचें न व्हावे दर्शन ।
खळा पंगती भोजन ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

‘एमपीएससी’च्या गोंधळात विद्यार्थ्यांचे भवितव्य अधांतरी!

पेपरफुटी, चौकशी आणि पुनर्मूल्यांकनामुळे भरती प्रक्रियांना ब्रेक

महाईन्यूज । नागपूर

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विविध भरती प्रक्रियांमधील कथित गैरप्रकार, पेपरफुटी, उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनावरील आक्षेप आणि न्यायालयीन प्रकरणांमुळे हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य अनिश्चिततेच्या गर्तेत सापडले आहे. काही परीक्षा रद्द झाल्या, काही पुढे ढकलण्यात आल्या, तर अंतिम शिफारस यादी प्रसिद्ध होऊनही नियुक्त्या रखडल्या आहेत. परिणामी, अनेक वर्षे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय, पैसा आणि मानसिक स्वास्थ्य पणाला लागले आहे.

औषध निरीक्षक (गट-ब) भरती परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणामुळे ‘एमपीएससी’च्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले. या प्रकरणात गुन्हे दाखल होऊन तपास सुरू झाल्यानंतर २६ ऑगस्ट २०२६ रोजी परीक्षा रद्द करण्यात आली. त्यामुळे परीक्षा देऊन निवड प्रक्रियेच्या पुढील टप्प्यांपर्यंत पोहोचलेल्या उमेदवारांना पुन्हा प्रतीक्षा करावी लागत आहे.

राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२५ च्या उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनाबाबत विद्यार्थ्यांनी आक्षेप घेतल्यानंतर आयोगाने पुनर्मूल्यांकनाचा निर्णय घेतला. त्यानंतर ३ ऑक्टोबरपासून नियोजित राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२६, स्थापत्य अभियांत्रिकी मुख्य परीक्षा आणि गट-ब अराजपत्रित मुख्य परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. सुधारित वेळापत्रकाबाबत अनिश्चितता निर्माण झाल्याने उमेदवारांच्या अभ्यासाच्या नियोजनावर परिणाम झाला आहे.

दुसरीकडे, महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा २०२४ ची अंतिम शिफारस यादी १७ जून २०२६ रोजी प्रसिद्ध होऊनही नियुक्त्या प्रलंबित असल्याचे समोर आले आहे. अन्न व औषध प्रशासन सेवा २०२३ मधील उमेदवारांनाही न्यायालयीन प्रक्रियेमुळे नियुक्त्यांची प्रतीक्षा करावी लागत आहे.

वारंवार परीक्षा पुढे ढकलणे, निकालांना विलंब आणि नियुक्त्या रखडणे यामुळे विद्यार्थ्यांवरील आर्थिक व मानसिक ताण वाढत आहे. ग्रामीण भागातून पुणे, नागपूर आणि इतर शहरांत येऊन अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास, शिकवणी आणि दैनंदिन खर्चाचा अतिरिक्त भार सहन करावा लागत आहे.

स्पर्धा परीक्षा विद्यार्थी असोसिएशनचे अध्यक्ष महेश घरबुडे यांनी या विलंबाबाबत चिंता व्यक्त केली आहे. दरम्यान, ‘एमपीएससी’ला परीक्षा स्थगित करण्याचे आदेश शासनाने दिलेले नसून आयोगाने सुधारणांच्या अनुषंगाने स्वतंत्र निर्णय घेतल्याचे अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे भरती प्रक्रिया पारदर्शक, वेळेत आणि निश्चित वेळापत्रकानुसार राबविण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे.

परीक्षांच्या चक्रव्यूहात विद्यार्थ्यांची स्वप्ने

अनेक वर्षे मेहनत करून स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा, निकाल आणि नियुक्तीसाठी वारंवार प्रतीक्षा करावी लागत आहे. पेपरफुटीचे आरोप, चौकशी आणि न्यायालयीन प्रक्रियांमुळे भरती प्रक्रियांना विलंब होत आहे. परिणामी, शासकीय नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्या हजारो तरुणांच्या भवितव्यावर अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे.

अदानींचा प्रकल्प अन् शक्तीपीठ महामार्ग; सह्याद्रीच्या अस्तित्वालाच धोका?

महाईन्यूज । सावंतवाडी

पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सह्याद्री पट्ट्यात प्रस्तावित दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे जंगलसंपदा, जलस्रोत आणि दुर्मिळ जैवविविधतेच्या संरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. कुडाळ तालुक्यातील आंजिवडे परिसरात अदानी ग्रीन एनर्जीचा २१०० मेगावॉट क्षमतेचा पंप स्टोरेज प्रकल्प आणि सावंतवाडी-दोडामार्ग तालुक्यांतील १३ गावांतून प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होण्याची भीती पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे.

अदानी समूहाचा ‘पाटगाव पंप स्टोरेज प्रकल्प’ कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांच्या सीमाभागात प्रस्तावित आहे. मूळ आराखड्यानुसार भुदरगड तालुक्यातील पाटगाव धरणाचा वरचा जलाशय म्हणून वापर करून आंजिवडे येथे खालचा जलाशय उभारण्याचे नियोजन होते. मात्र, स्थानिकांच्या विरोधानंतर पाण्याच्या वापराबाबत कंपनीने सुधारित भूमिका मांडली होती. प्रकल्प रद्द झाल्याच्या बातम्या यापूर्वी प्रसिद्ध झाल्या असल्या, तरी प्रस्तावाशी संबंधित कागदपत्रांमुळे त्याच्या अंतिम स्थितीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

प्रकल्पासाठी जंगलातील वृक्षतोड, जमीन संपादन आणि जलस्रोतांमध्ये बदल होण्याची शक्यता असल्याने पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास करण्याची मागणी होत आहे. सह्याद्रीतील नैसर्गिक जंगल आणि दुर्मिळ वनस्पतींचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करणे कठीण असल्याचे पर्यावरण अभ्यासकांचे मत आहे.

दुसरीकडे, नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्ग सावंतवाडी आणि दोडामार्ग तालुक्यांतील १३ पर्यावरणीय संवेदनशील गावांतून प्रस्तावित असल्याने स्थानिक ग्रामस्थांनी चिंता व्यक्त केली आहे. या पट्ट्यात समृद्ध वनसंपदा, औषधी वनस्पती, वन्यजीवांचे अधिवास आणि अनेक नैसर्गिक जलस्रोत आहेत. महामार्गासाठी होणारी वृक्षतोड आणि डोंगरउतारांवरील कामांमुळे पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

महामार्गासंदर्भात आयोजित जनसुनावण्यांमध्ये ग्रामस्थांनी विरोध नोंदविल्याचे सांगण्यात येत आहे. ज्येष्ठ पर्यावरणप्रेमी डॉ. जयेंद्र परुळेकर यांनी सह्याद्रीच्या संवेदनशील पट्ट्यातील संभाव्य पर्यावरणीय नुकसानीबाबत चिंता व्यक्त केली असून, निसर्गसंवर्धनासाठी स्थानिक नागरिकांनी संघटित होण्याचे आवाहन केले आहे. तसेच या प्रकल्पांविरोधात आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्याचे संकेत दिले आहेत.

सह्याद्रीच्या पर्यावरणाला कोणते धोके?

प्रस्तावित प्रकल्पांमुळे घनदाट जंगलातील वृक्षतोड, वन्यजीवांच्या अधिवासाचे तुकडीकरण, नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये बदल, डोंगरउतारांची धूप आणि स्थानिक जैवविविधतेवर परिणाम होण्याची शक्यता पर्यावरण अभ्यासकांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रकल्पांना अंतिम मंजुरी देण्यापूर्वी पर्यावरणीय परिणामांचे स्वतंत्र आणि पारदर्शक मूल्यांकन करण्याची मागणी होत आहे.

‘दिल्ली की ढाका? ढाका, ढाका’

बांगलादेशात पुन्हा भारताविरोधी घोषणाबाजी; हजारो आंदोलक रस्त्यावर

महाईन्यूज । बांगलादेश

बांगलादेशातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापलं असून राजधानी ढाक्यात भारतविरोधी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला आहे. ‘दिल्ली की ढाका? ढाका, ढाका’ अशा घोषणा देत हजारो आंदोलक रस्त्यावर उतरले आहेत. बांगलादेशातील वाढती महागाई, गंभीर वीज संकट आणि इंधन-गॅसच्या तुटवड्यामुळं पंतप्रधान तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील सरकारविरोधात संतापाची लाट उसळली आहे. या आंदोलनाच्या आडून पुन्हा एकदा भारताविरोधी राजकारणाचा खेळ सुरू झाल्याचे चित्र आहे.

शुक्रवारी ढाक्यातील ‘नॅशनल म्युझियम’समोर ‘नॅशनल सिटीझन पार्टी’चे संयोजक नाहिद इस्लाम यांच्या नेतृत्वाखाली एक भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला. या वेळी नाहिद यांनी गृह आणि ऊर्जा मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलनाचा इशारा दिला. मात्र, केवळ देशांतर्गत समस्यांपर्यंत मर्यादित न राहता या सभेत पुन्हा एकदा भारताला लक्ष्य करण्यात आलं.

भारतावर बांगलादेशविरोधात कट रचल्याचा आरोप करत नाहिद इस्लाम म्हणाले, “सध्याचे सरकार बांगलादेशला भारताच्या षड्यंत्रांपासून वाचवू शकत नाही.” आपल्या भाषणात त्यांनी सीमावर्ती भागातील कथित हत्या, आसाम व पश्चिम बंगालमधील मुस्लिमांवर अत्याचार होत असल्याचा दावा केला. इतकेच नव्हे तर दिल्लीत मशिदी पाडण्याचे नियोजन सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र, या दाव्यांच्या समर्थनार्थ त्यांनी कोणताही पुरावा सादर केला नाही.

या आंदोलनात जहाल विचारांचे खासदार हसनात अब्दुल्ला हेदेखील सहभागी झाले होते. हसनात यांनी गेल्या वर्षी भारताच्या ईशान्येकडील सात राज्ये भारतापासून तोडण्याची थेट धमकी दिली होती, ज्यावर भारताने तीव्र आक्षेप घेतला होता.

नाहिद इस्लाम यांनी १९९६ च्या गंगा पाणी वाटप करारावरूनही भारताला थेट इशारा दिला. “जर गंगा पाणी वाटप करारावर न्यायाने पुन्हा चर्चा झाली नाही, तर बांगलादेशची जनता पुन्हा रस्त्यावर उतरेल. या वेळी आम्ही आमच्या हक्काच्या पाण्यासाठी एक इंचही तडजोड करणार नाही,” असा पवित्रा त्यांनी घेतला.

भारत आणि बांगलादेश दरम्यानचा ३० वर्षांचा ऐतिहासिक गंगा पाणी वाटप करार या वर्षी डिसेंबरमध्ये संपत आहे.

बांगलादेशच्या जलसंपादनेने १२ डिसेंबरपूर्वी नवीन करारावर स्वाक्षरी व्हावी यासाठी दबाव वाढवला आहे.

बांगलादेशात गंगेला ‘पद्मा’ म्हणून ओळखले जाते, जी तेथील जीवन वाहिनी मानली जाते. देशातील सुमारे एक तृतीयांश लोकसंख्या उपजीविकेसाठी या नदी प्रणालीवर अवलंबून आहे.

ऑगस्ट २०२४ मध्ये शेख हसीना यांची सत्ता उलथवून लावल्यानंतर बांगलादेशात भारतविरोधी भावना भडकावण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत.यापूर्वी खासदार हसनात अब्दुल्ला यांनी “बांगलादेशात अस्थिरता निर्माण झाल्यास त्याची झळ सीमेपलीकडेही पोहोचेल. आमच्या देशात अस्थिरता निर्माण करणाऱ्यांना जर तुम्ही आश्रय देणार असाल, तर आम्हीही सात राज्यांतील फुटीरतावाद्यांना आश्रय देऊ.” ही धमकी दिली होती.

त्याचप्रमाणे जमात-ए-इस्लामीचे माजी प्रमुख गुलाम आझम यांचे पुत्र आणि निवृत्त ब्रिगेडियर जनरल अब्दुल्लाहील अमान आझमी यांनी तर “जोपर्यंत भारताचे तुकडे होत नाहीत, तोपर्यंत बांगलादेशात कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही,” असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. फेब्रुवारी २०२६ मध्ये तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील ‘बांगलादेश नॅशनल पार्टी’ सरकार सत्तेवर आल्यानंतर अशी विधाने काही प्रमाणात कमी झाली होती. मात्र, आता देशांतर्गत आर्थिक संकट गडद होताच पुन्हा एकदा भारताविरोधी कार्ड वापरले जात आहे.

थोडक्यात सांगायचे तर, बांगलादेशातील हे आंदोलन प्रामुख्याने तेथील देशांतर्गत महागाई आणि प्रशासकीय अपयशाविरुद्ध असले, तरी राजकीय स्वार्थासाठी भारताला मध्ये ओढून भारतविरोधी भावना भडकावण्याचा जुनाच प्रयत्न तेथे पुन्हा एकदा सुरू झाला आहे.

‘एका हुकूमशहाला घालवलं, आता नवा हुकूमशहा उगवतोय’

नाहिद इस्लाम यांनी थेट पंतप्रधान तारिक रहमान यांच्यावर निशाणा साधत म्हटले, “तारिक रहमान लंडनहून बांगलादेशात भ्रष्टाचार, लूटमार, वसुली आणि दहशत पसरवण्याचा प्लॅन घेऊन आले आहेत. आम्ही एका हुकूमशहाला हाकलून दिले आणि आता देशात नव्या हुकूमशहाचा उदय होत आहे. आम्ही या नव्या हुकूमशहाचाही पराभव करू.”

आंध्र प्रदेश हादरलं; शाळेतच विद्यार्थिनीवर करवतीने जीवघेणा हल्ला!

महाईन्यूज । आंध्र प्रदेश

आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील राप्तडू येथील एका जिल्हा परिषद शाळेत एक धक्कादायक घटना घडली. शुक्रवारी एका माथेफिरूने दहावीत शिकणाऱ्या १५ वर्षीय विद्यार्थिनीवर वर्गात घुसून यांत्रिक करवतीने भीषण हल्ला केला, यामुळे ती विद्यार्थीनी गंभीर जखमी झाली आहे. या वर्गातील हल्ल्यातील संशयित आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. प्राथमिक चौकशीत तो पीडितेचा नातेवाईक असल्याचं समोर आलं आहे.

पोलिसांनी सांगितलं की, शाळेत दुरुस्तीचं काम सुरू होतं, त्यामुळे काही शिक्षक आणि सुरक्षा रक्षकांनी त्याला कामगार समजून आत जाऊ दिले. मुलीच्या गळ्यावर आणि पोटावर खोल जखमा झाल्या असून, तिचा उजवा हात जवळजवळ तुटला आहे. मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करणारी दुसरी मुलगीही गंभीर जखमी झाली आहे. दोघींचीही एका खासगी रुग्णालयात मृत्यूशी झुंज सुरू आहे.

पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं की, हल्लेखोराला पकडण्यासाठी शोध मोहीम सुरू करण्यात आली होती. घटनेपूर्वी त्या व्यक्तीची आणि मुलीची ओळख होती का, याचा तपास अद्याप पोलीस करत आहेत. पोलिसांनी या प्रकरणाचा बहुआयामी तपास सुरू केला आहे. या हल्ल्यामुळे शाळेत प्रचंड घबराट पसरली, घटना घडत असताना विद्यार्थी आणि शिक्षकांनी तिथून पळ काढला. तो माणूस पळून गेल्यावर शिक्षकांनी पोलिसांना तात्काळ माहिती दिली आणि रुग्णवाहिका बोलावली.

गृहमंत्र्यांनी व्यक्त केला संताप

गृहमंत्री व्ही. अनिता या पोलीस तपासावर लक्ष ठेवून आहेत. मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला आहे. त्यांनी एका निवेदनात म्हटलं आहे, “शाळेत वर्गाच्या आत दहावीच्या विद्यार्थिनीवर झालेल्या या अमानुष हल्ल्यामुळे मी प्रचंड हादरलो असून संतापलो आहे. शाळेच्या आत आपल्या लहान मुलींना लक्ष्य करणाऱ्या हल्लेखोरांना आपल्या समाजात स्थान नाही. मी स्वतः तिच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहे आणि वैद्यकीय पथकाला तिला सर्वोच्च प्राधान्याने उपचार देण्याचे निर्देश दिले आहेत. या कृत्याला जबाबदार असलेल्या नराधमाला शोधून त्याला लवकरात लवकर कठोर कायदेशीर शिक्षा देण्याचे आदेश मी पोलिसांना दिले आहेत.”

हल्ला पाहणाऱ्या इतर विद्यार्थ्यांना भोवळ

दोन्ही मुलींना जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. हा हल्ला प्रत्यक्ष पाहणारे अनेक विद्यार्थी बेशुद्ध पडले किंवा त्यांना रडू कोसळलं. यांत्रिक करवत घेऊन आलेली व्यक्ती शाळेच्या आवारात कशी शिरली आणि कोणाच्याही अडवणुकीशिवाय वर्गापर्यंत कशी पोहोचली, असा सवाल पीडितेच्या कुटुंबीयांनी आणि इतर विद्यार्थ्यांच्या पालकांनी उपस्थित केला आहे.

मृणाल ठाकूरचा साडीतील सुंदर लुक

अभिनेत्री मृणाल ठाकूरने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. अभिनयासह तिच्या सौंदर्याचेही अनेकजण चाहते आहेत. नुकतेच तिने सोशल मिडियावर तिचे सुंदर फोटो शेअर केले आहेत. पारंपरिक लूकसोबतच तिचा यात एक वेगळा अंदाज पाहायला मिळत आहे. मृणालने इनस्टाग्राम अकाउंटवर शेअर केलेल्या फोटोत ती हिरव्या रंगाच्या साडीत पाहायला मिळत आहे. अभिनेत्रीने साडीसोबत चॉकलेटी रंगाचा ब्लाउज परिधान केला आहे, जो तिच्या संपूर्ण आउटफिटला खूपच सुंदर कॉन्ट्रास्ट देत आहे. तिचा हा लुक चाहत्यांच्या ही पसंतीस पडला असून, अनेकांनी तिच्या या लुकचे कौतुक केले आहे. सध्या तिच्या फोटोवर लाइक आणि कमेंटचा वर्षाव होत आहे. मृणाल ठाकूरच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, 'लव्ह सोनिया' या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. त्यानंतर तिने विविध प्रकारच्या भूमिका साकारत प्रेक्षकांच्या मनात स्वतःचे स्थान निर्माण केले. तिच्या आगामी प्रोजेक्ट्सबाबतही चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. त्यामुळे मृणाल पुढे कोणत्या भूमिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

पलक आणि इब्राहिमच्या ब्रेकअपच्या चर्चा

अभिनेता सैफ अली खानचा मुलगा इब्राहिम आणि अभिनेत्री श्वेता तिवारीची लेक पलक तिवारी यांच्या रिलेशनशिपच्या चर्चा गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहेत. अनेकदा दोघे एकत्रही पाहायला मिळाले. कधी पार्टीत, तर कधी एकत्र सुट्ट्यांचा आनंद घेताना हे दोघे पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. मात्र एकमेकांना डेटिंग केल्यानंतर आता दोघेही वेगवेगळ्या मार्गे जाणार असल्याची चर्चा होत आहे. तीन वर्षे एकमेकांना डेट केल्यानंतर आता हे कपल परस्पर सहमतीने वेगळे झाल्याचे वृत्त समोर आले आहे. मात्र, दोघांच्या विभक्त होण्यामागचं नेमकं कारण समोर आलेलं नाही. काही रिपोर्ट्समध्ये दोघांनी परस्पर संमतीने वेगळं होण्याचा निर्णय घेतल्याचंही म्हटलं जात आहे. दरम्यान, ब्रेकअपच्या बातमीनंतरही या दोघांनीही सोशल मीडियावरून एकमेकांना अनफॉलो केलेलं नाही. इब्राहिमचा एक मोठा टॉक शो लवकरच रिलीज होणार असल्याने त्याला या मुलाखतीदरम्यान ब्रेकअपच्या चर्चा टाळायच्या आहेत. म्हणूनच दोघांनीही हे प्रकरण शांत ठेवल्याचे सांगितले जाते. दरम्यान, इब्राहिम खान आणि पलक तिवारी हे इंडस्ट्रीतील लोकप्रिय कपल मानले जात होते.

ऑगस्टमध्ये साखरपुडा, ऑक्टोबरमध्ये नात्यात दुरावा?

रितेश देशमुखच्या 'वेड' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली अभिनेत्री आणि 'बिग बॉस' फेम जिया शंकर सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. काही महिन्यांपूर्वीच जियाने प्रियकर करण धनकसोबतच्या नात्याची जाहीर कबुली दिली होती. ऑगस्ट २०२६ मध्ये तिने साखरपुड्याची बातमी चाहत्यांसोबत शेअर केली होती. मात्र, आता दोघांच्या नात्यात दुरावा आल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. जियाच्या काही भावनिक सोशल मीडिया पोस्ट आणि करणला अनफॉलो केल्याच्या चर्चांमुळे या अफवांना सुरुवात झाली. यावर आता जियाने प्रतिक्रिया देत चाहत्यांना महत्त्वाची विनंती केली आहे. जिया शंकरने काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर काही भावनिक पोस्ट शेअर केल्या होत्या. या पोस्टमधील मजकुरामुळे चाहत्यांचे लक्ष तिच्या वैयक्तिक आयुष्याकडे वेधले गेले. एका पोस्टमध्ये तिने प्रार्थनेची ताकद आणि वेळेनुसार परिस्थिती बदलण्याबद्दलचा संदेश शेअर केला होता. तर दुसऱ्या पोस्टमध्ये तिने मनाला झालेल्या वेदनांचा

उल्लेख केला होता. काही वेळा केवळ स्वतःला सावरणे पुरेसे नसते, तर आपल्यासोबत जे घडले ते चुकीचे होते, याची जाणीव इतरांनाही व्हावी, अशी भावना तिने व्यक्त केली होती. जियाच्या या पोस्ट पाहून चाहत्यांनी तिच्या आयुष्यात काहीतरी बिनसल्याचा अंदाज व्यक्त केला. त्यातच तिने करण धनकला इन्स्टाग्रामवर अनफॉलो केल्याची चर्चा सुरू झाली. त्यामुळे दोघांचे नाते संपुष्टात आले आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला. जिया आणि करणच्या नात्याबद्दल सोशल मीडियावर वेगवेगळे तर्कवितर्क लावले जात आहेत. काही नेटकऱ्यांनी करणने जियाची फसवणूक केली असावी, असा संशय व्यक्त केला. मात्र, या दाव्याला दुजोरा देणारी कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. जियानेही करणने आपली फसवणूक केल्याचे कुठेही स्पष्टपणे सांगितलेले नाही. त्यामुळे सोशल मीडियावर सुरू असलेल्या चर्चांना सत्य मानणे योग्य ठरणार नाही. दोघांच्या नात्यात नेमके काय घडले आहे, याबद्दल अद्याप स्पष्टता नाही.

प्रसिद्ध कृष्णा वनडे मालिकेतून बाहेर

न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या तीन वनडेंसाठी भारतीय संघात बदल; वेगवान गोलंदाजाचा समावेश

महाईन्यूज । मुंबई

न्यूझीलंडविरुद्धच्या आगामी पाच सामन्यांच्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय (वनडे) मालिकेपूर्वी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णा याला हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे संपूर्ण वनडे मालिकेतून माघार घ्यावी लागली आहे. त्याच्या अनुपस्थितीत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) निवड समितीने जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज औकिब नबी याला पहिल्या तीन वनडेंसाठी संघात स्थान दिले आहे. यापूर्वी नबीची निवड मालिकेतील चौथ्या आणि पाचव्या सामन्यासाठी करण्यात आली होती. मात्र, प्रसिद्ध कृष्णाच्या दुखापतीमुळे त्याला मालिकेच्या सुरुवातीपासूनच भारतीय संघासोबत खेळण्याची संधी मिळणार आहे.

बीसीसीआयने ३१ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध कृष्णाच्या जागी औकिब नबीला पहिल्या तीन सामन्यांसाठी उपलब्ध करून देण्याची अधिकृत घोषणा केली. न्यूझीलंड दौऱ्यावरील वनडे मालिकेला ४ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. या मालिकेत भारतीय संघाचे नेतृत्व पहिल्या तीन सामन्यांत शुभमन गिल करणार आहे.

प्रसिद्ध कृष्णा इंग्लंड दौऱ्यादरम्यान झालेल्या हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीतून सावरत होता. मात्र, स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्यासाठी आवश्यक असलेली तंदुरुस्ती त्याला अद्याप मिळवता आलेली नाही. त्यामुळे त्याला न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी फिटनेस मंजुरी मिळाली नाही. दुखापतीतून पूर्णपणे सावरण्यासाठी आणि गोलंदाजीचा आवश्यक सराव पुन्हा करण्यासाठी त्याला आणखी वेळ लागणार आहे.

प्रसिद्ध कृष्णाच्या अनुपस्थितीमुळे भारतीय संघाच्या वेगवान गोलंदाजीच्या पर्यायांमध्ये बदल करावा लागला आहे. न्यूझीलंडच्या परिस्थितीत वेगवान गोलंदाजांना स्विंग आणि सीम मूव्हमेंटचा फायदा मिळू शकतो. त्यामुळे मालिकेच्या सुरुवातीलाच वेगवान गोलंदाजीचा पर्याय उपलब्ध असणे भारतासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. अशा परिस्थितीत औकिब नबीला मिळालेली संधी महत्त्वपूर्ण मानली जात आहे. देशांतर्गत क्रिकेटमधील प्रभावी कामगिरीच्या जोरावर भारतीय संघात स्थान मिळवणाऱ्या नबीकडून आता वेगवान गोलंदाजी विभागात महत्त्वपूर्ण योगदान देण्याची अपेक्षा असेल.

औकिब नबीच्या कामगिरीकडे लक्ष

जम्मू-काश्मीरचा २९ वर्षीय वेगवान गोलंदाज औकिब नबी याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. रणजी करंडक स्पर्धेतील त्याची कामगिरी विशेष चर्चेत राहिली आहे. मागील दोन रणजी हंगामांत त्याने एकूण १०४ बळी मिळवले. २०२५-२६ च्या हंगामात त्याने ६० बळी घेत जम्मू-काश्मीरच्या पहिल्या रणजी करंडक विजेतेपदात महत्त्वाची भूमिका बजावली. नबीने गेल्या महिन्यात वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या वनडे सामन्यातून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. आता न्यूझीलंडसारख्या संघाविरुद्ध खेळण्याची संधी मिळाल्यास त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची आणखी एक संधी मिळेल.

जागतिक कुस्तीत 'सुवर्ण' पटकावणारी मनीषा भानवाला पहिली भारतीय

महाईन्यूज । अस्ताना

भारतीय कुस्तीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद व्हावी, अशी ऐतिहासिक कामगिरी मनीषा भानवाला हिने केली आहे. जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकत तिने भारताची पहिली महिला विश्वविजेती मल्ल होण्याचा मान मिळवला. शुक्रवारी अस्ताना येथे झालेल्या अटीतटीच्या अंतिम लढतीत मनीषाने अमेरिकेच्या ए. एलिझाबेथ नेट हिचा ८-६ असा पराभव केला.

२९ वर्षीय मनीषाने ५९ किलो वजनी गटात ही ऐतिहासिक कामगिरी केली. विशेष म्हणजे, हा वजनी गट ऑलिम्पिकच्या अधिकृत वजनी गटांमध्ये समाविष्ट नाही. तरीही जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील सुवर्णपदकाचे महत्त्व मोठे आहे. यापूर्वी भारतीय महिला कुस्तीपटूंना या स्पर्धेत विश्वविजेतेपद पटकावता आले नव्हते. मनीषाने ही प्रतीक्षा संपवत भारतीय कुस्तीला नवी ओळख मिळवून दिली.

यापूर्वी अंशू मलिक हिने २०२१ मध्ये झालेल्या जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत महिलांच्या ५७ किलो वजनी गटाची अंतिम फेरी गाठली होती. मात्र, तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते. त्यामुळे मनीषाच्या सुवर्णविजयाला भारतीय महिला कुस्तीच्या दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

जागतिक कुस्ती स्पर्धेत भारताने यापूर्वी पुरुषांच्या गटातही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. दोन वेळचा ऑलिम्पिक पदकविजेता सुशील कुमार हा पुरुषांच्या कुस्तीत भारताचा एकमेव विश्वविजेता मल्ल ठरला होता. त्याने २०१० मध्ये मॉस्को येथे झालेल्या जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत ६६ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकले होते.

त्यानंतर बजरंग पुनिया याने २०१८ मध्ये बुडापेस्ट येथे झालेल्या जागतिक स्पर्धेची अंतिम फेरी गाठली होती. मात्र, त्याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. आता मनीषा भानवाला हिने महिला कुस्तीमध्ये जागतिक सुवर्णपदक जिंकत भारताच्या क्रीडा इतिहासात नवा अध्याय लिहिला आहे. मनीषाच्या या कामगिरीमुळे देशातील युवा महिला कुस्तीपटूंना नवी प्रेरणा मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण कामगिरी करण्यासाठी कठोर मेहनत, शिस्त आणि जिद्द आवश्यक असते. मनीषाच्या विजयाने भारतीय महिला कुस्तीची जागतिक स्तरावरील क्षमता अधोरेखित झाली आहे.

भारतीय महिला कुस्तीसाठी ऐतिहासिक क्षण

जागतिक कुस्ती स्पर्धेत अंतिम फेरी गाठणे आणि विश्वविजेतेपद मिळवणे, या दोन्ही गोष्टी खेळाडूच्या कारकिर्दीतील महत्त्वाचे टप्पे मानले जातात. मनीषाच्या विजयामुळे भारतीय महिला कुस्तीपटूंच्या क्षमतेवर पुन्हा एकदा जागतिक स्तरावर शिक्कामोर्तब झाले आहे. या स्पर्धेत यापूर्वी नीलम सिरोही हिने ५० किलो वजनी गटात, तर काजल ढोचक हिने ७६ किलो वजनी गटात अंतिम फेरी गाठत रौप्यपदके जिंकली होती. मात्र, त्यांना सुवर्णपदकापर्यंत मजल मारता आली नव्हती. मनीषाने अंतिम लढतीत प्रतिस्पर्धी खेळाडूवर मात करत सुवर्णपदक आपल्या नावावर केले.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
दि. 01 नोव्हेंबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

३४ सोसायट्यांचे ११ प्रश्न आयुक्तांच्या दरबारात

पाणीपुरवठा विभागाच्या निष्क्रियतेवर संताप!

सोसायट्यांच्या समस्यांचा डोंगर; महापालिका प्रशासनाला महासंघाचा जाब!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, मालमत्ता कर, रस्ते आणि पर्यावरणासह गृहनिर्माण सोसायट्यांच्या ११ प्रमुख प्रश्नांवर पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघाने (पीसीसीएचएसएफ) महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले. शहरातील ३४ सोसायट्यांची यादी आणि त्यांच्या प्रश्नांचे औपचारिक निवेदन आयुक्तांना सादर करण्यात आले. या प्रश्नांची प्राधान्याने हाताळणी करण्याबाबत आयुक्तांनी नोंद केल्याची माहिती महासंघाने दिली.

महापालिका आयुक्त कार्यालयात २८ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या बैठकीला आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, फेडरेशनचे अध्यक्ष सचिन लोंढे, सचिव सचिन गुणाले, सदस्य सचिन सिद्धे आणि रोहीत सावंत उपस्थित होते.

जून २०२६ मध्ये लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आणून दिलेल्या मुद्द्यांवर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. अपुरा पाणीपुरवठा, टँकरचा आर्थिक भुर्दंड आणि पाणीपुरवठा प्रकल्पांतील विलंब यांसह मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या सोसायट्यांना वर्गीकरण, प्रक्रिया व संकलनात येणाऱ्या अडचणी मांडण्यात आल्या. मालमत्ता कर आकारणीतील विसंगती, मालमत्ता हस्तांतरण आणि नावनोंदणी शुल्काबाबतच्या तक्रारीही प्रशासनासमोर ठेवण्यात आल्या.

महासंघाच्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार, मांडण्यात आलेले मुद्दे संबंधित अधिकाऱ्यांकडे सविस्तर तपासणी व पुढील कार्यवाहीसाठी सोपविण्यात येणार आहेत. प्रगतीचा आढावा घेण्यासाठी लवकरच पाठपुरावा बैठक आयोजित करण्याचेही ठरले. नागरिकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी महासंघाने घेतलेल्या पुढाकाराचे आयुक्तांनी कौतुक केले आहे.

> “सोसायट्यांच्या दैनंदिन अडचणी आणि प्रलंबित प्रश्न प्रशासनासमोर ठोसपणे मांडले आहेत. ३४ सोसायट्यांच्या निवेदनावर प्राधान्याने कार्यवाही होण्याची अपेक्षा आहे. प्रत्येक प्रश्नासाठी संबंधित विभागाची जबाबदारी आणि कार्यवाहीची कालमर्यादा निश्चित व्हावी. बैठकीतील चर्चेचे प्रत्यक्ष उपाययोजनांमध्ये रूपांतर होईपर्यंत फेडरेशन पाठपुरावा करेल. महापालिका उच्चपदस्थ अधिकारी लाच प्रकरणात जेरबंद होत आहेत. पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी अजय सूर्यवंशी यांना पाणी समस्येबाबतचे निवेदन ३ महिन्यांपूर्वी दिले होते. त्यावर काहीही कारवाई झालेली नाही, ही बाब अत्यंत संतापजनक आहे.
>
> \- सचिन लोंढे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघ.

रस्ते आणि मेट्रो स्थानकांपर्यंत सुरक्षित जोडणीची मागणी

अपूर्ण रस्ते, रुंदीकरणातील विलंब, पदपथांचा अभाव आणि आवश्यक नागरी सुविधांतील त्रुटींवर महासंघाने लक्ष वेधले. निवासी भागांतून मेट्रो स्थानकांपर्यंत सुरक्षित व सुलभपणे पोहोचण्यासाठी सुविधा निर्माण करण्याची मागणी करण्यात आली. अनधिकृत होर्डिंग्ज, लोंबकळणाऱ्या केबल्स, बेकायदा पार्किंग आणि सोसायट्यांच्या प्रवेशद्वारांजवळील वाहतूक अडथळ्यांवर प्रभावी कारवाईचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. अनधिकृत वृक्षतोड रोखणे, हरित क्षेत्रांचे संरक्षण, बांधकामांमुळे उडणारी धूळ, हवा व जलप्रदूषण आणि राडारोड्याची योग्य विल्हेवाट यावर चर्चा झाली. पर्यावरणीय नियमांच्या अंमलबजावणीसाठी डिजिटल देखरेख, पारदर्शक तपासणी आणि जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता महासंघाने मांडली. राष्ट्रीय महामार्ग, वाकड पूल आणि हिंजवडी–महापालिका सीमाभागातील वाहतूक व पायाभूत सुविधांच्या प्रश्नांकडेही लक्ष वेधण्यात आले. दत्ता मंदिर रस्त्यावरील ॲप्रिकॉट हॉटेल परिसरातील फटाके स्टॉलच्या अतिक्रमणाबाबत तक्रार मांडण्यात आली. नागरिकांसाठी पारदर्शक आणि प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध करण्याची मागणीही करण्यात आली. शहरातील अतिक्रमण कारवाईला नगरसेवक अडथळा निर्माण करतात. त्यामुळे प्रशासनाची कोंडी होत आहेत. या पार्श्वभूमीवर फेडरेशनने प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

कारवाईनंतरही रॅपिडोचे बुकिंग सुरूच

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कंपनीला बाईक टॅक्सी सेवा बंद करण्याच्या सूचना

महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

शहरामध्ये रॅपिडो ॲपवर बाईकटॅक्सीचे बुकिंग सुरू असल्याचे दिसत आहे. मात्र, या सेवेसाठी आवश्यक परवाना नसल्याने प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) कारवाई केली आहे. तरीही ॲपवर सेवा उपलब्ध असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. दुसरीकडे, उबेरने पुणे शहरातील बाईकटॅक्सीचा पर्याय हटविल्याचे दिसून येत आहे.

बुधवारी (२८ ऑक्टोबर) रॅपिडो ॲपवर पिंपरी चौकातून पुणे स्टेशनपर्यंत जाण्यासाठी बाईक टॅक्सीचे भाडे १४५ रुपये दाखवले जात होते. त्यामुळे प्रत्यक्षात सेवा सुरू आहे का? तसेच परवानगी नसताना बुकिंगचा पर्याय उपलब्ध कसा, असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे.

रॅपिडो कंपनीकडे बाईक टॅक्सी ॲग्रीगेटरचा परवाना नाही. १५ ऑक्टोबरला प्रादेशिक परिवहन प्राधिकरण आणि पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कंपनीला बाईक टॅक्सी सेवा बंद करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तरीही सेवा सुरू असल्याने २६ ऑक्टोबरला एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात कंपनीविरोधात तक्रार दाखल करण्यात आली. आरटीओच्या भरारी पथकाने रॅपिडोच्या माध्यमातून बाईक टॅक्सी सेवा देणाऱ्या पाच वाहनांवर कारवाई करून ५६ हजार रुपये दंड आकारला आहे.

अनेक राज्यांत बाईक टॅक्सीला परवानगी

देशभरात बाईक टॅक्सीबाबत एकसमान धोरण नसून, राज्यांच्या नियमांनुसार या सेवेचे संचालन केले जाते. गोवा, गुजरात, हरियाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, तेलंगणा, बिहार आणि मध्य प्रदेश यांसारख्या राज्यांत बाईक टॅक्सी सेवेसाठी नियामक तरतुदी आहेत. केंद्र सरकारच्या मोटार वाहन ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वांनुसार राज्यांना दुचाकींचा व्यावसायिक प्रवासी वाहतुकीसाठी वापर करण्यास परवानगी देण्याचा अधिकार आहे. मात्र, राज्याची धोरणे, वाहनाची व्यावसायिक नोंदणी, आवश्यक परवाने आणि ॲग्रीगेटरच्या अटी पूर्ण करणे बंधनकारक आहे. त्यामुळे एखाद्या राज्यात बाईक टॅक्सी सुरू असली, तरी दुसऱ्या राज्यात ती आपोआप अधिकृत ठरत नाही. राज्य सरकारने २०२५ मध्ये बाईक टॅक्सीविषयक नियम आणि शासन निर्णय प्रसिद्ध केले आहेत. मात्र, संबंधित कंपनीला आवश्यक परवाना मिळणे गरजेचे आहे. पिंपरी-चिंचवड आरटीओने रॅपिडोकडे आवश्यक परवाना नसल्याचे नमूद करून कारवाई केली आहे. असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

> “ रॅपिडोकडे आवश्यक परवाना नसल्याने नागरिकांनी या ॲपचा वापर करू नये. दुचाकी मालकांनीही आपली वाहने बाईक टॅक्सी सेवेसाठी नोंदवू नयेत. नियमांचे उल्लंघन आढळल्यास मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई केली जाईल.
>
> **- राहुल जाधव,** उपप्रादेशिक परिवहन अधिकारी.

मुलाला माझी आठवण येत राहिली असती, म्हणून त्यालाही नेतेय

महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड

पुणे जिल्ह्यात पिंपरी चिंचवडमध्ये वाकड येथील डांगे चौकाजवळील एका निवासी इमारतीच्या १८ व्या मजल्यावरुन उडी मारून ३३ वर्षीय विवाहित महिलेने आपल्या सहा वर्षांच्या मुलासह मृत्यूला कवटाळल्याची घटना शुक्रवारी संध्याकाळी घडली आहे. पोलिसांना आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेली चिठ्ठी सापडली आहे, त्यामध्ये महिलेने आपल्या आजारपणाला कंटाळून हे पाऊल उचलल्याचे नमूद केले आहे. तसेच, आपल्या पश्चात मुलाला आपली आठवण येईल, म्हणून त्यालाही सोबत नेत असल्याचे तिने त्यात लिहिले आहे.

मृत व्यक्तींची ओळख एकता मनोज भांगड (वय ३३) आणि तिचा मुलगा माधव मनोज भांगड (वय ६) अशी पटली आहे. ही घटना डांगे चौकाजवळील 'सिग्नेचर पार्क' सोसायटीमध्ये सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास घडली. वाकड पोलिसांच्या माहितीनुसार, संबंधित महिला गृहिणी होती, तर तिचे पती येरवडा येथील एका आयटी कंपनीत इंजिनिअर म्हणून कार्यरत आहेत. हे कुटुंब मूळचे राजस्थानचे असून गेल्या दोन वर्षांपासून या सोसायटीत राहत होते.

वाकड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांनी सांगितले की, "सुसाईड नोटमध्ये महिलेने आपल्या आजारपणाला कंटाळून हे टोकाचे पाऊल उचलल्याचे म्हटले आहे. तसेच, आपल्या पश्चात मुलाला आपली आठवण येईल, म्हणून त्यालाही सोबत नेत असल्याचे तिने त्यात नमूद केले आहे." पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करण्यासाठी आणि पंचनामा पूर्ण करण्यासाठी फॉरेन्सिक पथकाला पाचारण केले. त्यानंतर, मृतदेह शवविच्छेदनासाठी पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात पाठवण्यात आले.

महिलेच्या नातेवाईकांना या घटनेची माहिती देण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक साळुंखे यांनी सांगितले की, तपास पूर्ण झाल्यानंतर या प्रकरणातील अधिक तपशील समोर येतील.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये काय दिसलं?

सीसीटीव्ही फुटेजमध्ये आई मुलाला १८ व्या मजल्यावर घेऊन जाताना दिसली. इमारतीच्या अंतर्गत डक्टमधून मोठा आवाज आल्यानंतर रहिवाशांना या घटनेची माहिती मिळाली. त्यांनी घटनास्थळी धाव घेतली असता, महिला आणि तिचा मुलगा मृत अवस्थेत आढळले. घटनेची माहिती मिळताच वाकड पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी तपास सुरू केला. पोलिसांनी सोसायटीतील सीसीटीव्ही फुटेज तपासले, ज्यामध्ये महिला आपल्या मुलासोबत थेट १८ व्या मजल्यावर जाताना दिसली.

स्थायी समिती सभेमध्ये कोट्यवधींच्या विकासकामांना मंजुरी

रस्ते, आरोग्य, स्वच्छता आणि नागरी सुविधांच्या कामांना प्राधान्य; विकासकामांना हिरवा कंदील

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. स्थायी समितीची साप्ताहिक सभा नुकतीच महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात संपन्न झाली. या सभेमध्ये शहरातील विविध प्रभाग आणि परिसरातील रस्ते विकास, दुरुस्ती, आरोग्य व नागरी सुविधांशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण प्रस्तावांना मान्यता देण्यात आली.

रुग्णालय यंत्रणा देखभाल: चिंचवड येथील तालेरा रुग्णालयातील HVAC, OT आणि विद्युत विषयक यंत्रणेचे पुढील २ वर्षांसाठी चालन, देखभाल व दुरुस्ती करण्याच्या कामाला मंजुरी देण्यात आली. सुदर्शननगर हेल्थ क्लब जवळील काम: प्रभाग क्र. १९ मधील सुदर्शननगर हेल्थ क्लब जवळील जुने सी.डी. वर्क पाडून नवीन बांधण्याच्या कामाच्या निविदेला मंजुरी देण्यात आली.

रावेत भागातील रस्त्यांचा विकास: प्रभाग क्र. १६ मधील रावेत भागात ताब्यात आलेले डी.पी. व नॉन डी.पी. रस्ते विकसित करण्याच्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची QCBS पद्धतीने नेमणूक करण्यास मंजुरी देण्यात आली. रस्ते डांबरीकरण (पवनानगर व आदर्शनगर): सन २०२६-२७ करीता प्रभाग क्र. २२ मधील पवनानगर व आदर्शनगर परिसरातील रस्ते हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करण्याचे काम करून घेण्यास मंजुरी मिळाली.

तात्पुरती ध्वनिक्षेपण व प्रकाश व्यवस्था: 'ड' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध कार्यक्रमांकरिता तात्पुरत्या स्वरूपाची ध्वनिक्षेपण, सीसीटीव्ही, जनरेटर व प्रकाश व्यवस्था करण्याच्या निविदेला मान्यता दिली. तसेच 'ग' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत पिंपरी व थेरगाव उपविभागातील विविध कार्यक्रमांसाठीच्या निविदा मंजूर करण्यात आल्या. आकुर्डी परिसरातील स्थापत्य कामे: प्रभाग क्र. १५ मधील आकुर्डी गावठाण व इतर परिसरात स्ट्रॉर्म वॉटर लाईन, फुटपाथ व इतर स्थापत्य विषयक कामे (नागरिकांचा सहभाग अंतर्गत) करण्यासाठी करारनामा करण्यास मान्यता दिली.

दफनभूमी काळजीवाहक मुदतवाढ: दापोडी, निगडी आणि दिघी येथील एकूण ५ मुस्लिम व लिंगायत दफनभूमींसाठी नवीन निविदा प्रक्रिया चालू असेपर्यंत, संबंधित धर्मदाय संस्थांना किमान वेतन दरानुसार १ महिन्यासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

स्ट्रीट लाईट विद्युत पुरवठा: 'क' क्षेत्रीय कार्यालय प्रभाग क्र. २ मधील कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे-नाशिक रोड ते सीएनजी पंपपर्यंत रस्ता अद्यावत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या रस्त्यावरील स्ट्रीट लाईट, डेकोरेटिव्ह पोल आणि हायमास्ट पोल कार्यान्वित करण्यासाठी म.रा. वि.वि.कं.लि. कंपनीस सुरक्षा ठेव, सर्व्हिस चार्जेस व प्रोसेसिंग फी अदा करण्यास मंजुरी दिली. राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान: अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कार्यरत असलेल्या शहर अभियान व्यवस्थापक व समुदाय संघटक या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत किंवा पुढील आदेश येईपर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता दिली. प्रभाग क्र. १६, १७, १८, २२ मधील रिक्षा टेम्पो व्यवस्था: प्रभाग क्र. १६, १७, १८ व २२ मधील कामासाठी नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत पुढील ८ महिन्यांसाठी वाहन, इंधन व चालकासह मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

मनपा इमारतींची दुरुस्ती व फर्निचर कामे: प्रभाग क्र. १५ मधील मनपा इमारतींची स्थापत्य विषयक दुरुस्ती, फर्निचर तसेच देखभाल दुरुस्तीची कामे करण्याच्या निविदेला मंजुरी देण्यात आली. वाय. सी. एम. रुग्णालयातील मशीन दुरुस्ती: यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील (YCM) X-ray विभागातील Digital Radiography System मशीनच्या हमी कालावधीनंतर थेट पद्धतीने सिएमसी (CMC) करण्यासाठी मशीनच्या मूळ उत्पादक कंपनीसोबत करारनामा करण्यास मान्यता देण्यात आली. पदपथ उभारणी व रोड फर्निचर कामे: प्रभाग क्र. ९ मध्ये विविध ठिकाणी पदपथ उभारणे आणि नेहरुनगर, विठ्ठलनगर परिसरातील स्थापत्य कामांसाठीची निविदा स्वीकृत करण्यात आली. तसेच प्रभाग क्र. १० मधील शाहूनगर भागात रोड फर्निचर विषयक कामांनाही मंजुरी देण्यात आली.

विविध भागांतील रस्ते आणि नाला दुरुस्ती: प्रभाग क्र. ६ (धावडेवस्ती, गुळवेवस्ती), प्रभाग क्र. ८ (सेक्टर १,२,३,४,६), प्रभाग क्र. २० (विशाल थिएटर, संत तुकारामनगर, कासारवाडी व एमआयडीसी), आणि प्रभाग क्र. ६ मधील नाला दुरुस्ती व स्मशंकरभूमी स्थापत्य कामे अशा विविध प्रभागांतील रस्ते दुरुस्ती, डांबरीकरण, स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स आणि नाल्यांच्या दुरुस्तीच्या कामांसाठी पात्र ठरलेल्या निविदांना स्थायी समितीने मंजुरी दिली. सार्वजनिक सुविधा व स्वच्छतागृहांची दुरुस्ती: प्रभाग क्र. १५, प्रभाग क्र. ४ (दिघी-बोपखेल), प्रभाग क्र. ३ (चोविसावाडी, वडमुखवाडी, मोशी, डुडूळगाव) आणि प्रभाग क्र. १८ परिसरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती, पेव्हिंग ब्लॉक बसवणे आणि दिशानिर्देश फलक लावणे या कामांच्या निविदांना मंजुरी देण्यात आली.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था विकास: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था सांगवी येथील विद्यार्थ्यांना दृश्याधारित शिक्षण व व्हर्च्युअल प्रयोगशाळा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठीच्या ई-लर्निंग मॉड्यूल खर्चाच्या प्रस्तावाचे स्थायी समितीने अवलोकन केले. तसेच महिला आयटीआय कासारवाडी येथे अतिवृष्टीमुळे तातडीने साहित्य खरेदीच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली. या सर्व विकासकामांना स्थायी समितीने मंजुरी दिल्याने शहरातील नागरी पायाभूत सुविधा अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

गाडी धुताना बिबट्याची तरुणावर झडप; आंबेगाव तालुक्यातील घटना

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग (ता. आंबेगाव) येथील मानकरखंडी वस्तीवर गुरुवारी (दि. २९) पहाटे गाडी धूत असलेल्या तरुणावर बिबट्याने हल्ला केला. दिनेश सयाजी मानकर असे जखमी तरुणाचे नाव असून, त्यांच्यावर मंचर उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले. विशेष म्हणजे, या वेळी परिसरात एकाच वेळी दोन बिबटे दिसल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दिनेश मानकर हे कामानिमित्त मुंबईहून गावी आले होते. गुरुवारी पहाटे चारच्या सुमारास त्यांना पुन्हा मुंबईला जायचे असल्याने त्यांनी रस्त्यालगत चारचाकी उभी करून गाडी धुण्यास सुरुवात केली. त्याचवेळी रस्त्याच्या पश्चिमेला असलेल्या डोंगराच्या बाजूने दोन बिबटे आले. त्यातील एका बिबट्याने रस्ता ओलांडून थेट गाडीजवळ येत मानकर यांच्यावर झडप घातली, तर दुसरा बिबटा काही अंतरावर थांबून होता.

मानकर हे गाडी धुण्यासाठी वाकलेले असताना बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. मात्र, प्रसंगावधान राखत त्यांनी हातातील बादली पुढे धरून प्रतिकार केला. तरीही बिबट्याने त्यांच्या हातावर पंजा मारल्याने ते जखमी झाले. बादलीने प्रतिकार केल्यानंतर बिबट्याने तेथून पळ काढला. मानकर यांनी आरडाओरडा केल्यानंतर परिसरातील नागरिक मदतीसाठी धावून आले.

घटनेची माहिती मिळताच मंचरचे वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. जखमी मानकर यांना मंचर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली. दरम्यान, एकाच वेळी दोन बिबट्यांचे दर्शन झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. वनविभागाने बिबट्याला पकडण्यासाठी घटनास्थळी पिंजरा लावला आहे. परिसरातील बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी माजी सरपंच बाळासाहेब पिंगळे यांनी केली आहे.


D Y PATIL
INTERNATIONAL
UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform
APPROVED BY BAR COUNCIL
OF INDIA
SCHOOL OF
LEGAL
STUDIES
Learn Law. Lead Change.
BA LLB (Hons)
5 YEARS INTEGRATED PROGRAM
BBA LLB (Hons)
5 YEARS INTEGRATED PROGRAM
#2
Among New Age
Private Universities
In Maharashtra
Moot Court &
Practical
Training
Legal Aid
Support
ADMISSIONS OPEN 2026
+91-8600091180
admission@dypiu.ac.in
www.dypiu.ac.in